मंगळवार, दि. १३ मे २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २७८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# वाळू माफिया व प्रशासनाच्या संगनमताने अवैध वाळू उपसा



आमदार बबनराव लोणीकर यांचा गंभीर आरोप

## नियमबाह्य व अवैध वाळू उपसा, मा. न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन; कठोर कारवाईची आवश्यकता - आ. लोणीकर

**जालना । प्रतिनिधी-** अंबड व घनसावंगी तालुक्यातील ३० ते ३५ गावांमध्ये दररोज ५०० हायवाच्या माध्यमातून अवैध वाळू उपसा करून बीड व अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये पाठवला जातो नियमाप्रमाणे नदीवरील पुलापासून किंवा पाण्याच्या विहिरीपासून किमान ५०० मीटरच्या आत वाळू उपसा करता येत नाही असे असताना पुलाच्या व गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या पाण्याच्या विहिरी शेतकऱ्यांच्या विहिरी यांच्या अगदी ५० ते १०० फूट अंतरावर प्रचंड वाळू उपसा करण्यात आला असून या अवैध वाळू उपसामुळे गोदावरी नदीवरील पूल कोसळण्याची देखील भीती निर्माण झाली आहे. दररोज २० ते ३० टन वजनाचे ५०० हवा ट्रक भरून अवैध वाळू उपसा करत असल्यामुळे सर्व ग्रामीण व तालुका मार्ग असणारे डांबरीकरणाचे रस्ते फुटलेले आहेत. असेही आमदार बबनराव लोणीकर म्हणाले. वाळू माफिया व प्रशासन यांच्या संगनमताने हा अवैध वाळू उपसा सुरू असून या प्रकरणात जिल्हाधिकारी किंवा जिल्हा पोलीस अधीक्षक अजिबात गंभीर नाहीत असेच दिसून येत आहे.



आपण स्वतः जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीमध्ये व विधानसभा अधिवेशनामध्ये या बाबी वारंवार मांडल्या असून प्रशासनाने या बाबींकडे मात्र दुर्लक्ष केल्याचे दिसून येते ही बाब अत्यंत गंभीर असून अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफी यांची वाहने जप्त करून त्याचा लिलाव करण्यात यावा त्याचबरोबर या सर्व गुन्हेगारांवर हद्दपारी ची कारवाई करण्यात यावी आणि याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे किती अवैध वाळू साकारण्यात आला याची मोजमाप करून वाळू मफियांच्या संपत्तीतून शासनाच्या महसुलाची रिकवरी करण्यात यावी अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली.

अंबड तहसीलदार श्री विजय चव्हाण हे त्यांच्या सहकाऱ्यांसह पान २ वर

युवा आदर्श

### कणखर धडा ...

पाकड्यांना शिकवा
आता कणखर धडा
सल्ला देण्या तोफा
धडाडू लागे धडधडा
दहशतवादास सरळ
जहन्नुममध्ये धाडा
वॉटसॅपवरचे लेखक
पाजती ओषधी काढा
पाजळे ज्ञान शलाका
अकलेचा दौडा घोडा
मतप्रदर्शित करे त्वरे
विलंब नावडतो थोडा
सहज बोलतात कसे
आंतकखोरां जखडा
जशी यांना पूर्ण आहे
माहिती खडा न् खडा
जा घरात घुसून पाडा
दहशती रक्ताचा सडा
बोलघेवड्या पोपटांनो
फुका पोपटपंची सोडा
सैनिकांना देती सल्ले
निर्भयते सामर्थ्ये लढा
उगवले लष्कर प्रमुख
करा करा विचके दाढा
युध्दनिति सोपी नसते
कसे समजवावे मुढा
सापडत नाही सन्मार्ग
कधी झपाटल्या सूडा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## तथागत भगवान बुद्ध यांच्या विचारांची समाजाला गरज - कैलास गोरंटयाल

**जालना । प्रतिनिधी -** शांतता प्रस्थापित करण्यासाठी विश्वाला शांतीचा संदेश देणारे तथागत भगवान गौतम बुद्ध यांचे विचार प्रेरणादायी असून त्यांच्या या मार्गदर्शक विचारांची समाजाला खऱ्या अर्थाने गरज आहे असे प्रतिपादन माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी येथे बोलतांना केले.

जालना शहरातील अजंता बुद्धविहार, आनंदनगर आणि आदर्श नगर यांच्या संयुक्त विद्यमाने तथागत भगवान बुध्द यांच्या २५६९ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात गोरंटयाल बोलत होते.यावेळी प्रमुख मार्गदर्शक व अध्यक्ष अशोक नावकर, सदानंद टवले, शिवप्रकाश चीतळकर, संजय पाखरे, राहुल पवार आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना माजी आमदार कैलास गोरंटयाल म्हणाले की,तथागत भगवान गौतम बुद्ध यांचे शांतीचे विचार विश्वाने स्वीकारले आहे.भगवान बुध्दांच्या विचारात मोठी ताकत असून त्यांचे शांतीचे विचारच जगाला तारू शकतात असा विश्वास देखील गोरंटयाल यांनी यावेळी व्यक्त केला.कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुणे गोरंटयाल यांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाचे सुत्र संचालन सदानंद टवले यांनी केले. पौर्णिमा बौध्द धम्म महिला महासंघ,जेष्ठ नागरिक,बाल बालीका जयंती उत्सव समितीचे सचिव रवि शिंदे, पान २ वर



## अहिंसेचा मार्ग हाच बुद्धाचा धम्म

भन्ते धम्मधर शाक्यपुत्र थेरो यांचे प्रतिपादन

**जालना । प्रतिनिधी -** अहिंसेचा मार्ग हाच तथागत गौतम बुद्ध यांचा धम्म आहे, असे प्रतिपादन भन्ते धम्मधर शाक्यपुत्र थेरो यांनी आज( दि. १२) येथे केले.

तथागत गौतम बुद्ध यांच्या २५६९ व्या जयंतीनिमित्त भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने जालना शहरातील मस्तगड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासमोर आयोजित महा बुद्ध वंदनाप्रसंगी उपदेश देतांना ते बोलत होते. यावेळी भन्ते रेवत, श्रामणेर आदींची प्रमुख उपस्थिती होती.




यावेळी उपदेश देतांना भन्ते धम्मधर थेरो पुढे म्हणाले की, जगाला अहिंसा व शांततेचा संदेश तथागत गौतम बुद्धांनी दिला, विश्वातील मानव सुखी होण्यासाठी अहिंसा शिवाय पर्याय नाही. युद्धाने कोणताच प्रश्न सुटणार नाही तर तो अधिक जटिल होण्याचा संभव असतो. मानवी जीवन सुखी करणे हाच तथागत गौतम बुद्धांचा धम्म पान २ वर

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले गुरूवारी जालन्यात

**जालना । प्रतिनिधी -** केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले हे गुरूवार दिनांक १५ मे रोजी जालना शहरात येणार आहेत.



रिपाइंचे जिल्हाध्यक्ष गणेशराव रत्नपारखे यांचे दिनांक २५ एप्रिल रोजी निधन झाले. यानिमिताने दिनांक १५ मे रोजी नामदार रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत रत्नपारखे यांच्या निवासस्थानी सकाळी ९ वाजता शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. या शोकसभेस रिपाइंचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष बाबुराव कदम, प्रदेश संघटन सचिव ॲड. ब्रम्हानंद चव्हाण, मराठवाडा अध्यक्ष मिलिंद शेळके, मराठवाडा सचिव सुधाकर रत्नपारखे आदी उपस्थित राहणार आहेत. नामदार आठवले हे कालकथित गणेश रत्नपारखे यांचे बंधू सुरेश रत्नपारखे पान २ वर

## गोव्यात १७ मे पासून ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव

**छत्रपती संभाजीनगर । जालना । प्रतिनिधी -** सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव आणि संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून गोव्यात १७ ते १९ मे या कालावधीत 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाला 'आर्ट ऑफ लिव्हिंग'चे संस्थापक गुरुदेव श्री श्री रविशंकरजी, पतंजली योगपीठाचे संस्थापक प.पू. योगऋषि स्वामी राम देवजी, श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेव गिरिजी, राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री श्री. योगी आदित्यनाथजी, उपमुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे आदी अनेक मान्यवरांना या कार्यक्रमाला आमंत्रित करण्यात आले आहे. देशविदेशांतून २५ हजार तर छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यातून २५० हुन अधिक साधक, धर्मप्रेमी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती सनातन संस्थेचे श्री. दत्तात्रेय वाघूळदे यांनी दिली.

## महाराष्ट्र राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत सोतोकान कराटे परतूर च्या विद्यार्थ्यांचे यश

**परतूर । प्रतिनिधी -** ११वी महाराष्ट्र राज्यस्तरीय कराटे स्पर्धा दि.११/०५/२०२५, रोजी तालुका क्रीडा संकुल पुसद येथे घेण्यात आली होती. मुख्य आयोजक, सेन्साई संतोष कांबळे, मुख्य पंच, सिहान, योगेश चव्हाण. व सौजन्य, वैभव गोविंदरावजी फुले .डॉ.अक्षय बळीराम शिंदे. यांच्या उपस्थितीत हि स्पर्धा आयोजित दिनांक ११में रोजी करण्यात आलेली होती या स्पर्धेत एकुण दहा टिमणे आपला सहभाग घेतला होता.यामध्ये परतूर येथील सोतोकान कराटे डो इंडिया च्या कराटे विध्यार्थी यांनी या स्पर्धेत आपल्या प्रदर्शनाने उपस्थित चाहत्यांचे मनजींकले या वेळी सोतोकान कराटे टीम ने दहा मेडल प्राप्त करण्यात यशस्वी झाले पान २ वर



# संपादकीय पान

## सावित्रीच्या लेकिंचे प्रेरणादायी यश!

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. राज्याचा बारावीचा निकाल ९१. ८८ टक्के लागला. नेहमीप्रमाणे कोकण विभागाने या निकालात बाजी मारली. कोकण विभागाचा ९६ . ७४ टक्के निकाल लागला असून कोकण विभागाने राज्यात अव्वल स्थान पटकावले असून लातूर विभाग निकालात तळाशी राहिला आहे. लातूर विभागाचा निकाल ८९. ४६ टक्के इतका लागला आहे. लातूर विभाग टक्केवारीत सर्वांचा मागे पडला हे या निकालातून स्पष्ट दिसते. मागील दशकात लातूर विभाग हा दहावी बारावीच्या निकालात सातत्याने अग्रस्थानी राहिला आहे. लातूर पॅटर्न हा दहावी बारावीच्या निकालासाठी राज्यात प्रसिद्ध होता. आताही नीट आणि जेईई परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांची पसंती लातूरलाच असते. नीट आणि जेईईची तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांची पहिली पसंती पुणे आणि दुसरी पसंती लातूर असते. ज्यांना शक्य आहे ते पालक आपल्या पाल्यांना राजस्थानातील कोटा येथेही पाठवतात मात्र महाराष्ट्रात लातूर पॅटर्नने आपली एक वेगळी ओळख निर्माण केली असताना लातूरची निकालात इतकी घसरण होणे हे आश्चर्यकारकच आहे. अर्थात निकालात घसरण फक्त लातूर विभागाची झाली असे नाही तर संपूर्ण राज्याचा निकाल यावर्षी घसरला आहे. यावर्षी राज्याचा निकाल ९१. ८८ टक्के लगला जो मागील वर्षीच्या तुलनेत १.४९ टक्क्यांनी कमी आहे. मागील वर्षी म्हणजे २०२४ साली बारावीचा निकाल ९३.३७ टक्के होता. यावर्षी बारावीचा निकाल का घसरला ? असा प्रश्न विचारला जात आहे. यावर्षी राज्य सरकारने कॉपी मुक्त परीक्षा अभियान राबवले त्यामुळे हा निकाल घसरला असण्याची शक्यता आहे. अर्थात हे चांगलेच झाले. कॉपीमुक्त परीक्षा या अभियानामुळे राज्याची खरी गुणवत्ता समोर आली. मध्यंतरी राज्याचा निकाल हा ९७ ते ९९ टाक्यांच्या दरम्यान असायचा आणि त्यात शेकडो विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण मिळायचे. सरकारने कॉपीमुक्त परीक्षा हे अभियान राबवल्या मुळे कॉपिला काही प्रमाणात आळा बसला आहे. सरकारने हे अभियान यापुढेही चालू ठेवावे. विद्यार्थ्यांनी कॉपिवर अवलंबून न राहता वर्षभर नियमितपणे अभ्यास करावा कारण काळ झपाट्याने बदलत आहे. आता शिक्षणातही तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. आज उत्तरपत्रिका शिक्षक तपासित आहेत पण भविष्यात या परीक्षांच्या उत्तरपत्रिका ए आय च्या मदतीने तपासल्या जातील. जेंव्हा ए आय तंत्रज्ञान वापरून उत्तरपत्रिका तपासल्या जातील तेंव्हा निकाल आणखी घसरण्याची शक्यता आहे. सोलापूर जिल्हा परिषदेचे तंत्रस्नेही शिक्षक दिसले गुरुजींनी यावर्षी त्यांच्या वर्गाच्या उत्तरपत्रिका ए आय तंत्रज्ञान वापरून तपासल्या. ए आय तंत्रज्ञानाने अवघ्या काही सेकंदात एक उत्तर पत्रिका तपासून होते हे त्यांनी दाखवून दिले त्यामुळे या तंत्रज्ञानाचा वापर भविष्यात उत्तर पत्रिका तपासण्याकरिता होणार हे नक्की त्यामुळे यापुढे विद्यार्थ्यांना अभ्यासाशिवाय गत्यंतर नाही. अर्थात राज्याचा एकूण निकाल घसरला असला तरी या निकालात मुलींनी नेहमीप्रमाणे बाजी मारली आहे. यावर्षी जवळपास ९४.५८ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलांपेक्षा मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण जवळपास ५ टक्क्यांनी अधिक आहे. मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८९.५१ टक्के इतके आहे. अर्थात दहावी असो की बारावी निकालात कायम मुलीच बाजी मारत असतात हे आपण यावर्षीच नाही तर मागील अनेक वर्षापासून पाहत आहोत. निकालात मुलींनी बाजी मारणे ही नक्कीच अभिमानास्पद बाब आहे. परीक्षार्थी मुलींची संख्या कमी असूनही उत्तीर्ण होणाऱ्या मुलींचे प्रमाण जास्त असणे हे मोठ्या शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनाचे लक्षण आहे. सावित्रीच्या लेकिंची ही गरुड भरारी पाहून संपूर्ण महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचावली आहे. एकेकाळी केवळ चूल आणि मूल इतकेच ज्यांचे जग होते त्या मुली आज गगनभरारी मारत आहेत. सावित्रीच्या लेकींचे हे यश निश्चितच प्रेरणादायी आहे. एकेकाळी ज्या मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते त्याच मुली आज शिक्षण व्यवस्थेचे सर्वात मोठे संचित बनू पाहत आहे. पुरोगामी महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब आहे. कठोर परिश्रमाने मुलींनी हे यश मिळवले आणि इतरांना प्रेरणा दिली. कठोर परिश्रमातून मुलींनी हे यश मिळवून समाजाला एक सकारात्मक संदेश दिला आहे. बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन आणि सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस मनापासून शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## भरकटलेली तरुणाई विनाशाच्या उंबरठ्यावर!

प्रत्येक देशाची ताकद ही त्या देशातील तरुणांवर अवलंबून असते. ज्या देशात तरुणांची संख्या जेवढी अधिक असते, तेवढी त्या देशाची ताकद वाढत असते. कारण तरुण हेच देशाचे भवितव्य व आधारस्तंभ असतात. आणि तेच खऱ्या अर्थाने देशाची प्रगती आणि विकास साधू शकतात. आपल्या लाडक्या भारत देशाला प्रगतीपथावर नेऊन या जगाची महासत्ता बनवू शकतात. फक्त आपल्या भारतीय तरुणांनी ही गोष्ट मनावर घेऊन तशी वाटचाल करायला हवी. कारण जगात सर्वात मोठा तरुणांचा देश म्हणून भारताला ओळखले जाते. भारतात इतर देशांच्या तुलनेत तरुणांची संख्या सर्वात जास्त आहे. आणि हे तरुण देश विकासात जेवढे सक्षम व प्रबळ असतील तेवढा देश सुद्धा बलशाली व मजबूत बनतो. पण हे तरुण नुसते प्रबळ व बलशाली असून चालणार नाही तर ते देशाला विकसनशील करण्यात किती क्रियाशील व कार्यक्षम आहेत. हे अगोदर तपासले पाहिजे. त्यानुसार जगातील देशांच्या विकासाचा आलेख ठरवता येतो. जर एखाद्या देशातील तरुण शैक्षणिक क्षेत्राच्या बाहेर जाऊन व्यसनाच्या विखारी विळख्यात अडकले तर त्या देशाच्या विकासाचा वाढता आलेख घसरायला वेळ लागणार नाही. कारण हेच व्यसनाधीन तरुण देशाच्या प्रगतीला बाधा ठरू शकतात. केवळ देशात तरुणांची संख्या जास्त असून चालणार नाही तर त्या देशातील तरुण हे उच्चशिक्षित, निर्व्यसनी, कार्यक्षम आणि सर्व क्षेत्राची परिपूर्ण जाण असणारे जाणकार असले पाहिजेत. म्हणजे त्या देशाचा विकास व्हायला वेळ लागणार नाही. पण आजकालची तरुणाई शैक्षणिक प्रवाहाच्या बाहेर जाऊन, इतरत्र कुठेही भरकटत चालली आहे. आणि स्वतःला व्यसनाच्या विखारी विळख्यात ओढून घेत आहे. व्यसनाच्या बाबतीत आपला भारत देश इतर देशांच्या तुलनेत फार पुढे गेला आहे. आणि व्यसन करण्यात आमची युवा पिढी आघाडीवर आहे. अगदी नव्याने मिसरूड फुटू लागलेले यंग पोट्टे देखील व्यसन करण्यात फार पुढे गेले आहेत. शालेय विद्यार्थी सुद्धा शाळेत जाऊन गुटखा, तंबाखू व सिगारेट पीत आहेत. काही काही विद्यार्थी तर शाळेत दारूच्या बॉटल घेऊन जात आहेत. आणि खुशाल वर्गात बसून पीत आहेत. म्हणजे शालेय जीवनापासूनच बहुतांश विद्यार्थी व्यसनाच्या आहारी गेलेले दिसत आहेत. ज्या वयात खूप खूप अभ्यास व चिंतन करायचे सोडून, शरीरयष्टी मजबूत ठेवायचे सोडून आणि स्वतःला घडवायचे सोडून आमचे विद्यार्थी जर शालेय जीवनापासूनच वाईट व्यसनाच्या विळख्यात अडकत असतील तर मग आपल्या देशाची प्रगती होणे शक्य आहे का? देशाला जगाची महासत्ता बनवणे शक्य आहे का? आपला देश मजबूत, बलशाली व भक्कम होईल का? या प्रश्नांची उत्तरे स्वतःला विचारून आमच्या विद्यार्थ्यांनी आत्मपरीक्षण करायला हवे. असे मला वाटते. हे विद्यार्थी कसेबसे दहावीला काठावर पास होऊन, कॉलेज जीवनात प्रवेश करतात आणि शिक्षणाच्या नावाखाली आई-वडिलांचे खूप खूप आर्थिक शोषण करतात. आई वडिलांना वाटते की, आपला मुलगा खूप खूप शिकेल व नोकरीला लागेल, म्हणून ते आपल्या मुलाला शहरी भागात शिकायला ठेवतात आणि त्यांना खूप खूप कष्ट करून पैसा पाठवतात. पण आमचे विद्यार्थी आई-वडिलांनी पाठवलेला पैसा शिक्षणासाठी न लावता ढाब्यावर किंवा दारूच्या दुकानावर उधळतात. हे चित्र सध्या शहरी भागात सर्रास पाहायला मिळत आहे. शिक्षणाच्या नावाखाली आई-वडिलांचे रक्त पिऊन, कुठेही भरकटत जाणारी तरुणाई स्वतःला विनाशाच्या उंबरठ्यावर घेऊन जात आहे. वाईट व्यसनाच्या आहारी जाऊन नकळत स्वतःला मृत्यूच्या दाढेत ओढत आहे. शैक्षणिक प्रवाहाच्या बाहेर जाऊन स्वतःचे जीवन बरबाद करून घेत आहे. म्हणूनच की काय? आजकाल बहुतांश विद्यार्थी दिशाहीन होऊन अंधारात चाचपडत आहेत. व्यसनाचे वाढते प्रमाण आणि शैक्षणिक पात्रतेचा अभाव पाहून आजकालच्या मुलांना कोणी मुलगी पण द्यायला तयार होत नाही. गावागावांत अगदी पन्नाशीत प्रवेश केलेल्या अविवाहित पुरुषांची संख्या प्रचंड वाढली आहे. एकतर बेकारीचा शिक्का आणि व्यसनाचा बट्टा लागलेल्या तरुणांना मुलगी द्यायला कोण तयार होईल? वेळेवर लग्न होत नाही म्हणून बरेच तरुण तरुणी नैराश्यात जाऊन स्वतःचे जीवन संपवत आहेत. हे आपण सोशल मीडियावर, वर्तमानपत्रात आणि टीव्हीवर रोज पाहत आहोत. खरेतर ही तरुणाई स्वतःला बरबाद करण्यात, स्वतःच कारणीभूत आहे. कारण अगोदर शालेय जीवनापासून लागलेली वाईट व्यसनाची सवय आणि कॉलेज जीवनात व्यसनाचे वाढते प्रमाण यामुळे बहुतांश विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर पाणी पडले आहे. आणि त्यांची शैक्षणिक लिंक तुटल्यामुळे ते इतरत्र कुठेही भरकटत जाऊन स्वतःचा विनाश करून घेत आहेत. आपल्याच हाताने स्वतःच्या पायावर दगड मारून, स्वतःला विनाशाच्या खाईत लोटत आहेत. म्हणूनच आजकालच्या तरुण पिढीचे भवितव्य खूप धोक्यात आहे. आणि तरुण पिढीचे धोक्याचे भवितव्य देशाला घातक ठरू शकते. हे आपण लक्षात घ्यायला हवे. ज्या देशातील तरुण व्यसनाला मुठ माती देऊन शैक्षणिक क्षेत्रात मन लावून अभ्यास करतात ते तरुण देशाच्या विकासाला हातभार लावतात. अमेरिका, जपान व चीन हे प्रगत राष्ट्र जगाची महासत्ता म्हणून ओळखले जातात. हे तिन्ही प्रगतशील देश बुद्धांच्या तत्त्व प्रणालीवर चालणारे आहेत. म्हणूनच या देशात व्यसनाचे प्रमाण खूप कमी आहे. आणि अभ्यासाचे प्रमाण जास्त आहे. इथे अंधश्रद्धेला कसलाच थारा नाही. म्हणूनच या देशांचा पूर्णपणे विकास झालेला आहे. आपला भारतही इतर देशांपेक्षा काही कमी नाही. कारण आपला देश प्रजासत्ताक राष्ट्र आहे.



या देशात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वात श्रेष्ठ व पवित्र अशा सर्वधर्मसमभाव जपणाऱ्या भारतीय संविधानाची निर्मिती करून समस्त भारतीयांना समता, स्वातंत्र्य व बंधुता बहाल केली आहे. गरीब असो की श्रीमंत प्रत्येकाला एक आणि एकाच मताचा अधिकार देऊन हुकूमशाहीला नाकारले आहे. आणि लोकशाहीला जवळ केले आहे. जगातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश म्हणून भारताकडे संपूर्ण जग आदराने बघत आहे. आपल्या भारतीय संविधानाची प्रेरणा घेऊन इतर देश आपल्या देशाला विकसनशील करू पाहत आहेत. हे आमच्या भारतीय तरुणांनी ओळखायला हवे. आपल्या भारतीय संविधानाची प्रेरणा घेऊन इतर देश त्यांच्या देशाचा चौफेर विकास करत असतील तर मग आपण प्रजासत्ताक भारताचे सुजान लोक एवढे मागे का आहोत? या प्रश्नाचा विचार केला तर असे म्हणता येईल की, आमच्या युवा पिढीने इतरत्र कुठेही भरकटत न जाता आपल्या भारतीय महापुरुषांचा आदर्श घेऊन, व्यसनाला मूठ माती द्यावी आणि खूप खूप शिक्षण शिकावे, स्वतःच्या पायावर उभे राहून, सामाजिक क्रांती करावी... आपोआपच देशाचा कायापालट होईल...

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## स्वराज्य महारैली यात्रा जालन्यात

**जालना -** राष्ट्रीय समाज पक्ष आयोजित पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त चौंडी ते दिल्ली स्वराज्य महारैली यात्रेचा जालना शहरात अंबड चौफुली येथे आगमन झाले याप्रसंगी जालना येथील धनगर समाज बांधवांनी राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून अभिवादन केले. याप्रसंगी उपस्थित ओमप्रकाश चितळकर, पांडुरंग कोल्हे, शिवप्रकाश चितळकर, नितीन कानडे, दीपक बोराडे, सर्जेराव सरोदे, गणेश खरात सुभाष वाघमोडे दीपक शिंदे सुरेश हाके आदी उपस्थित होते.

### वाचकांचे मनोगत

## पाकमध्ये घुसून दहशतवाद्यांच्या छावण्या उद्ध्वस्त

जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथील मिनी स्वित्झर्लंड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पर्यटन स्थळी २२ एप्रिल रोजी आलेल्या पर्यटकांमधील हिंदू धर्मातील पर्यटकांना त्यांच्या कुटुंबियांसमोर २६ पर्यटकांना ठार केले होते.त्यात महाराष्ट्र राज्यातील सहा पर्यटक होते.या घटनेचे तीव्र पडसाद देशभरात उमटले.खरे तर भारताने त्याच वेळी सडेतोड उत्तर द्यायला हवे होते.तसे झाले नाही.भारतात दहशतवादी घुसले तेव्हा भारतीय पोलीस, सैन्य दलातील सक्षम गुप्त हेर यंत्रणा यांना सुगावा लागला नाही.केंद्रीय गृहमंत्रालय, केंद्रीय संरक्षण मंत्रालय यांच्याकडे माहिती मिळाली होती की नाही. गृहमंत्री आणि संरक्षण मंत्री यांनी आपल्या यंत्रणांना तातडीने कारवाई करण्याचे आदेश का दिले नाहीत.७ मे २०२५ रोजी मध्यरात्री १.00 ते १.३0 पर्यंत अर्धा तासात पाकिस्तान आणि पी ओ के मध्ये घुसून भारतीय सेनेने ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. यात १00 दहशतवादी ठार झाले.भारतीय सेनेने सकाळी भारतीय सेनेच्या इतिहासात पहिल्यांदाच दोन महिला लष्करी अधिकार्यांनी या घटनेचा वृतांत मांडला.परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री आणि वायुदल आणि आर्मिच्या महिला अधिकारी कर्नल सोफिया आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी भारतीय सैन्याचे शौर्य जगासमोर मांडले.भारताने पाकिस्तानच्या भूमीवर 'ऑपरेशन सिंदूर' जोरदार मोहीम राबवून दहशतवादी अतिरेक्यांना जशास तसे उत्तर दिले. त्या आधी सिंधु जल कराराला स्थगिती दिली.पाकिस्तानशी व्यापार बंदीचा निर्णय घेतला.पाकिस्तान नेहमीच भारता विरुद्ध कुरापती करीत असतो .देशभरात अनेक वर्षे दहशतवादाने थैमान घातले आहे सर्व धर्मिय भारतीयांची व सर्व राजकीय पक्षांची एकच इच्छा आहे.पाकचा कायमचा बंदोबस्त करा आम्ही तुमच्या पाठीशी आहोत.भारतीय सैन्य दलातील सैनिक व महिला सैन्य अधिकारी यांना वीरमरण आले.पंतप्रधानांनी या मोहिमेला सिंदूर ऑपरेशन असे नाव दिले आहे. आमच्या माय भगिनींचे कुंकू पुसले यांचे दु:ख कायम स्मरणात राहील पण भारतीय सैन्याने जशास तसे उत्तर दिले याचा अभिमान भारतीय नागरिक म्हणून सर्व भारतीयांना आहे.कर्नल सोफीया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांना सॅल्युट , शहिद झालेल्या सैनिक व अधिकार्यांना नम्र अभिवादन .जय हिंद !

**महादेव गोळवसकर, कुर्ला** ९८६९४७६२०९,
mahadeogolvaskargmail.com

## जॉय संस्थेचा पुरस्कार वितरण सोहळा ७ जून रोजी रंगणार

**मुंबई -** जॉय ऑफ गिविंग सामाजिक संस्थेचा वर्धापन दिन येत्या ७ जून रोजी जोगेश्वरीच्या अस्मिता शाळेच्या राजपुरिया सभागृहात पहिल्या माळ्यावर प्रमुख पाहुणे जोगेश्वरी भूषण डॉ एम डी वळंजू, अविनाश दौंड कामगार नेते, प्रदीप जोशी शिक्षकेतर कर्मचारी नेते, प्रिन्सिपॉल फादर निकी, जगदीश जायले वकील मुंबई उच्च न्यायालय, ड सिस्टर रुषिला रिबेलो, सेवानिवृत्त एसीपी वसंत ढोबळे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार असून यावेळी दादा पटवर्धन, जनार्दन जंगले, विश्वनाथ पंडित यांना त्यांच्या भरीव योगदानासाठी जीवनगौरव पुरस्कार तसेच आदर्श शिक्षक, आदर्श संपादक, आदर्श माता, आदर्श शाळा व संस्था, आदर्श पत्रकार, आदर्श समाजसेवक अशा विविध क्षेत्रात उत्तुंग कामगिरी केलेल्या मान्यवरांना देखील पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष गणेश हिरवे यांनी दिली. जॉय अनेक वर्षापासून समाजातील गोर गरीब वंचित विधार्थी, घरेलु कामगार, वृद्ध यांच्यासाठी कार्यरत आहे.विशेष म्हणजे जॉय चे सभासद कार्यकर्ते आणि समाजात सामाजिक जाणीव असलेले देणगीदार यांच्या प्रयत्नाने वर्षभर अनेक ठिकाणी मदत पोहचवित असतात.अनेकांनी जॉय च्या कार्याचे कौतुक केलं आहे.

### पान १ वरुन

## वाळू माफिया व ...

गोदावरी नदीपात्रातून होणारा अवैध वाळू उत्खनन रोखण्यासाठी गस्त घालत असताना बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील वाळू माफीयांनी तहसीलदारांच्या अंगावर ट्रॅक्टर घातला तहसीलदारांनी बाजूला पळण्याचा प्रयत्न केल्यामुळे थोडक्यात बचावले परंतु त्यानंतरही वाळू माफी यांनी सामूहिकरीत्या लाठ्या-काठ्यांसह तहसीलदारांवर हल्ला करून त्यांना जखमी केले, ट्रॅक्टर पकडणे व सदरील हल्ला या दोन्ही बाबींमध्ये तहसीलदार चव्हाण यांच्या सहकाऱ्याच्या गुडघ्याला दुखापत झाली असून हे प्रकरण अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहे यापूर्वी देखील परतुर तहसीलदार यांच्यावर प्राणघतक हल्ला झाला होता या बाबीचा दाखला देत आमदार बबनराव लोणीकर यांनी संबंधित वाळू माफीयांना तात्काळ अटक करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

अंबड तहसीलदार श्री विजय चव्हाण यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार शहागड येथे हायवा माध्यमातून अवैध वाळू सासू असल्याची माहिती मिळाली होती त्यानुसार तहसीलदार चव्हाण यांच्यासह त्यांचे सहकारी सकाळी ६ वाजेपासून शहागड येथे गस्त घालत होते तहसीलदाराने प्रत्यक्ष पाहणी केली असता १५ लोक अवैध वाळू भरना करत असल्याचे दिसून आले. त्यामध्ये गेवराई येथील ईशान इब्रान खान या वाळू माफिया सह त्याच्या इतर ३ सहकाऱ्यांनी तहसीलदारांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. प्रसंगावधान राखून तहसीलदारांनी आपल्या खाजगी पिस्तुलातून ४ फायरिंग केला नसत तर कदाचित तहसीलदारांना आपला जीव गमवावा लागला असता तेवढी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. कर्तव्यावर रुजू असणाऱ्या अधिकाऱ्यांना आपला जीव धोक्यात घालून काम करावे लागत आहे ही बाब लक्षात घेता जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी अत्यंत गांभीर्यपूर्वक याबाबत लक्ष घालणे आवश्यक आहे असे आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

वाळू माफियांवर केवळ दंडात्मक कारवाई केली जात आहे त्यामुळे त्यांना कायद्याचा कुठलाही धाक राहिलेला नसून तहसीलदारांसारख्या अधिकाऱ्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यापर्यंत या वाळू माफियांची मजल गेली आहे ही बाब अत्यंत गंभीर असून अशा गुन्हेगारांवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाने वाळू धोरणात बदल केला असून आतापर्यंत कुठल्याही निविदा सुरू झालेल्या नसताना कायद्याला न जुमानता अरेरावी करत तहसीलदारांना जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यापर्यंत मजल गेली आहे असेही लोणीकर यांनी सांगितले

मागच्या काही दिवसापासून नदीपात्राच्या लगतच्या नागरीकांच्या भ्रमणध्वणी वरुन तक्रारी प्राप्त होत असून रेती उत्खनन वाहतूक चोरी करणारे वाळूमाफिया नदीपात्रात जावून हायवा ट्रक, लोडर, जेसीबी, इत्यादीव्दारे रेती उत्खनन करुन तो रेती जेसीबी, हायवा ट्रकच्या माध्यमातून अवैधरित्या वाहतूक करत असल्याचे तक्रारी आपेगांव, शहागड, हसनापुर, पाथरवाला, सिद्धेश्वर पॉईट, गोंदी या ठिकाणाहून प्राप्त झालेल्या होत्या. त्याअनुषंगाने तहसीलदार यांनी गोपनीय गस्त घातली असता आपेगांव, शहागड या ठिकाणी नदीपात्रात हायवा ट्रक व ट्रॅक्टर आढळून आले होते. अशी माहिती देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली.

नदीपात्रात कार्यवाही केली असता २० ते २५ हायवा ट्रक, लोडर आढळून आलेले होते. त्या कार्यवाही दरम्यान ६ हायवा जप्त करण्यात आले होते. शहागड येथे सुद्धा गोपणीय चौकशी दरम्यान अनेक लोकांची नावे प्राप्त झालेली असून ते दररोज २० ते २५ हायवाव्दारे रेतीची चोरी केली जाते. तसेच हसनापुर, पाथरवाला, सिद्धेश्वर पॉईट या ठिकाणी सुद्धा प्रतिबंधक रोक असूनसुद्धा अवैध रेती उत्खनन करुन चोरी व वाहतूक मोठ्या प्रमाणात केली जात आहे. सदरील वाळू माफिया जाणीवपुर्वक कायदयाचा भंग करत असून जनतेमध्ये दहशत निर्माण करत आहे. हि बाब कायद्याच्या दृष्टीने गंभीर असून त्यामुळे जनतेमध्ये दहशत निर्माण होत असल्याच्या अनेक तक्रारी देखील प्राप्त झाल्या आहेत असेही लोणीकर यावेळी म्हणाले.

## तथागत भगवान ...

अर्जून जाधव राजे, अशोकराव पंडित, अक्षय निवारण, सागर कदम,सुंदर साळवे,के.टी. हिवाळे,संजय वेव्हल, सोनाजी नावकर, भुजंगराव भिसे, हिम्मतराव मस्के,भिमराव पांडव, संजय खरात,परिसरातील उपासक हजर होते..कार्यक्रमानंतर भोजन दान करण्यात आले.शेवटी आभार माधुरी वेव्हल मोरे यांनी मानले.

## अहिंसेचा मार्ग ...

आहे. हिंसेतून वैभव वाढत जाते आणि टोकाचा हिंसाचार वाढतो. वाढत्या दहशतवादाने जगाचे नुकसान होईल,हे निश्चित आहे,बुद्धाची शिकवण हिच मानवाचे कल्याण करणारी आहे. तथागत गौतम बुद्धांचा मार्ग म्हणजे अहिंसेचा मार्ग, म्हणजेच बुद्धाचा धम्म असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रारंभी तथागत गौतम बुद्ध व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन पंचशीला बुद्ध वंदना घेण्यात आली.

यावेळी जेष्ठ सामाजिक नेते ड. . बी. एम. साळवे, ड. शिवाजी आदमाने, सुदामराव सदाशिवे, सुधाकर निकाळजे, महेंद्र रत्नपारखे, दिनकर घेवंदे, बबनराव रत्नपारखे, तसेच भारतीय बौध्द महासभेचे जिल्हाध्यक्ष संजय हेरकर, महासचिव राजकुमार दांडगे, छाया हिवाळे, सुलेखा मनवर, सुनील जाधव, बालू बोर्डे, प्रेमानंद मगरे, ज्ञानेश्वर डांगे, राजेंद्र पवार, मनकर्णा डांगे, अनुराधा हेरकर, सत्यशिला राऊत, शशिकला पानपाटील, पी. एस. गडवे, एम.एच. सोनकांबळे, प्रमोद खरात, प्रा .शिवाजी लहाने, बी. के. पैठणे, प्रदीप घाटेशाही, जितेंद्र कांबळे, गौतम मोरे, सुभाष म्हस्के, सोनाजी नावकर, दिपक कांबळे, गोंडगे यांच्यासह बौद्ध उपासक - उपासिका उपस्थित होत्या. आभार भारतीय बौद्ध महासभेचे जालना तालुकाध्यक्ष सतीश वाहुळे यांनी मानले.

## केंद्रीय राज्यमंत्री ...

तसेच चिरंजीव महेंद्र रत्नपारखे व परिवाराचे सात्वंनही करणार आहेत.

जालना जिल्ह्यातील रिपाइंचे पदाधिकारी, तालुकाध्यक्ष, महिला आघाडी, युवक आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी या शोकसभेस उपस्थित राहावे, असे आवाहन रिपाइंच्या युवक आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष ड. सिध्दार्थ चव्हाण तसेच मधुकर बोबडे, प्रकाश रूपवते,बबनराव रत्नपारखे, मुकुंद पाईकराव, विजय खरात, अनिल खिल्लारे, राजेंद्र भिंगारदेव, राहुल आदमाने,महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष संगिताबाई अंभोरे, उपाध्यक्ष बेबीबाई कांबळे, लहू उघडे आदींनी केले आहे.

## महाराष्ट्र राज्यस्तरीय ...

आहेत. पाच गोल्ड मेडल, दोन सिल्व्हर मेडल.तीन कास्य मेडल.आयान खान.गोल्ड मेडल,मान्यता चव्हाण,गोल्ड मेडल, रेहान शेख, गोल्ड मेडल, शेख मोहम्मद मलिक, गोल्ड मेडल,जगजीतसिंग जुनी. गोल्ड मेडल,आदीत्य प्रधान. सिल्व्हर मेडल,शिवम मोताळे, सिल्व्हर मेडल, ओवी कुळकर्णी. कांस्य मेडल, अनन्या लाळे. कांस्य मेडल. श्रीतेज भामट.या सर्वांणी यश प्राप्त करून परतूर शहराचे नाव लौकीक केले. या सर्वांना कराटे मास्टर माणिक जैस्वाल यांचे मार्गदर्शन लाभले.यशस्वी होण्यासाठी विध्यार्थीनी मोलाची कामगिरी बजावली आहे. या करिता परतूर शहरात त्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

## मुली आणि महिलांसाठी मोफत ड्रायव्हिंग प्रशिक्षणाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील बरोजगार महिला आणि मुलींसाठी मोफत ड्रायव्हिंग प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले असून त्यासाठी दि. २० मे २०२५ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत ऑनलाईन अथवा ऑफलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचे आवाहन उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा सौ. करुणा मोरे यांनी केले आहे.

उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने शाळकरी मुली आणि महिलावर होणारे अत्याचार कमी करण्यासाठी महिलांना सक्षम करुन त्यांच्या सुरक्षेसह रोगाराचा प्रश्न सोडविण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. शाळा आणि महाविद्यालय तसेच महिला उद्योगपती, महिला अधिकारी यांच्या वाहनावर महिलांना वाहनचालक म्हणून नियुक्ती दिल्यास शाळकरी मुली आणि महिलावरील अत्याचाराचे प्रमाण कमी होईल, हा या उपक्रमाचा हेतु आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यात पायलट प्रोजेक्ट म्हणून १९ ते ३५ वयोगटातील गरजू मुली अथवा महिला लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.



बेरोजगार, विधवा, परित्यक्ता महिलांना या प्रशिक्षासाठी प्राधान्य देण्यात येणार आहे. ज्या मुली बेरागजागर आहेत आणि पोलीस भरतीची तयारी करीत आहेत, अशा मुलींनाही प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर त्यांना शाळा किंवा महाविद्यालयाच्या स्कुल व्हॅन किंवा महिलांच्या वाहनावर वाहन चालक म्हणून काम करण्याची संधी मिळणार आहे. शिवाय ड्रायव्हिंग प्रशिक्षण पुर्ण केलेल्या मुलींना आणि महिलांना १० दिवसाचे स्वसंरक्षण आणि शारीरीक विकास या विषयावर प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यामुळे गरजू मुली आणि महिलांनी जास्तीत-जास्त अर्ज करावेत असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा सौ करुणा मोरे यांनी केले आहे.

अर्ज भरण्याची लिंक पुढील प्रमाणे आहे. https://forms.gle/SrejVcVk1vD1tbXy9

## वैश्विक असंतुलनाच्या पार्श्वभूमीवर भारताची दिशादर्शक सनातन मूल्यपरंपरा

### गोमंतकाच्या पावन भूमीत घुमणार सनातन राष्ट्राचा शंखनाद

आज जग एका निर्णायक वळणावर उभे आहे. युक्रेन-रशिया, इस्रायल-गाझा, चीन-तैवान युद्ध आणि भारत-पाकिस्तानमधील वाढते तणाव हे तिसऱ्या महायुद्धाच्या सावल्या अधिक गडद करत आहेत. प्रसिद्ध फ्रेंच भविष्यवेत्ता नॉस्ट्रॅडॅमस याने २०२५ च्या सुमारास एका विनाशकारी जागतिक युद्धाचा उल्लेख त्याच्या भविष्यवाण्यांमध्ये केला आहे. काश्मीरमध्ये घडत असलेले हल्ले, सीमेवरील कुरापती, आंतरराष्ट्रीय दहशतवादाचे जाळे यांमुळे देशावर महायुद्धाची वीज कधी कोसळेल, हे सांगता येत नाही. त्यातच भर म्हणून जगभर भूकंप, वादळे, ज्वालामुखी, हवामानात सातत्याने होणारे बदल यांसारख्या नैसर्गिक आपत्तीही मानवाचे जगणे कठीण करत आहेत. सर्व प्रकारे दाटून आलेली ही अस्थिरता कधी संपणार, कधी शांतपणे आयुष्य जगता येणार, याची प्रत्येकाला प्रतीक्षा आहे.

**जग भारताकडे आशेने पहात आहे**

नॉस्ट्राडॅमसने स्पष्ट सांगितले आहे, तिसऱ्या महायुद्धानंतर जगाचा नेतृत्वभार एक आध्यात्मिक राष्ट्र घेईल. त्यांच्यासह इतर अनेक संत, द्रष्टे, भविष्यवेत्ता, राजकीय विश्लेषक आणि आधुनिक विचारवंतांनीही विविध प्रकारे तिसऱ्या महायुद्धाची शक्यता व्यक्त केली आहे. विविध देशांमध्ये चालू असलेला संघर्ष हे या महायुद्धाची नांदी आहेत. त्याचा वणवा कधी पेटेल, हे कोणीच सांगू शकणार नाही. असे असले, तरी सगळे देश भारताकडे आशेने पहात आहेत, हे मात्र नक्की. युक्रेन आणि रशिया युद्धातही भारताने मध्यस्थी करावी, असे अनेकांनी सुचवले होते. भारताला स्वतःला आतंकवाद, नक्षलवाद, भ्रष्टाचार, अनैतिकता यांसारख्या अनेक समस्यांनी ग्रासलेले असतांना भारत अन्य देशांना आधारासाठी, मध्यस्थीसाठी पर्याय का वाटत आहे, याचे उत्तर आहे भारताला लाभलेले धार्मिक अधिष्ठान !


**सनातन मूल्येच मानवतेचे रक्षण करू शकतात**

युद्ध, तणाव आणि नैतिक अधःपतनाच्या गर्तेत सापडलेल्या जगासाठी सनातन धर्मच शाश्वत उपाय आहे. जेव्हा मोठमोठे देश भारताने आशेने पहात आहेत, तेव्हाच भारतानेही धर्माधिष्ठित राष्ट्रनिर्मितीची दिशा स्वीकारली, तर तो संपूर्ण मानवतेसाठी नवचैतन्याचा दीपस्तंभ ठरेल. ती परिवर्तनाची वेळ आता आली आहे, असेच संकेत दिसू लागले आहेत. अनेक धर्मनिरपेक्ष म्हणवणारी राष्ट्रे कोलमडत असतांना भारत उभारी घेत आहे. केवळ विकास नाही, तर त्याला नितीमूल्यांची जोड दिल्यामुळेच देशाचा जागतिक स्तरावर दबदबा निर्माण होत आहे, हे तर उघडच आहे. आज आपण सगळेच पहातो की, स्वतःचा धर्म उघडपणे सांगणारे, नवरात्रीत उपवास करणारे, महाकुंभमेळ्यात अमृतस्नान करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी आंतराराष्ट्रीय स्तरावरील प्रभावशाली नेते आहेत. आपली सनातन नितीमूल्ये, संस्कृती आणि धर्माच्या आधारेच भारत नव्या युगाचा दीपस्तंभ बनेल, असे अनेक द्रष्ट्या संतांनी सांगितले आहे. जगभर अस्थिरता पसरलेली असताना सनातन मूल्येच मानवतेचे रक्षण करू शकतात. धर्मनिरपेक्षतेची काँग्रेसने लादलेली बेडी तोडून जेव्हा हे राष्ट्र सनातन धर्मी हिंदु राष्ट्र म्हणून पुन्हा उदयास येईल, तेव्हा भारत खऱ्या अर्थाने विश्वगुरुपदावर विराजमान होईल.

**'सनातन राष्ट्र' - वर्तमान जागतिक अस्थिरतेवरील एकमेव वैदिक उत्तर !**

तो दिवसही आता दूर नाही, कारण गोमंतकाच्या पावन भूमीत घुमणार आहे सनातन राष्ट्राचा शंखनाद ! सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले हे धर्माच्या आधारे देशाचे पुनरुत्थान करण्यासाठी गेल्या ३ दशकांहून अधिक काळ कार्यरत आहेत. धर्म हा राष्ट्राचा प्राण आहे, हे त्यांचे वचन आहे. त्यासाठी धर्माचरणी प्रजा निर्माण होण्यासाठी त्यांच्या मार्गदर्शनाखाली हजारो साधक साधना करत आहेत. सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांनी संकल्पिलेल्या सनातन राष्ट्राचा शंखनाद अनेक संत-महंत आणि नेत्यांच्या उपस्थितीत होणार आहे. १७ ते १९ मे २०२५ या काळात गोव्यातील फर्मागुडी, फोंडा येथे 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' संपन्न होत आहे. हा महोत्सव म्हणजे एका नवीन युगाचा, एका धर्माधारित राष्ट्रनिर्मितीचा आणि एका आध्यात्मिक क्रांतीचा शंखनाद आहे. या महोत्सवात शिक्षण, अर्थव्यवस्था, राज्यशास्त्र, न्यायव्यवस्था या सर्व बाबींमध्ये धर्माधारित दृष्टिकोन कसा असावा, यावर मार्गदर्शन मिळेल.

जगाच्या उंबरठ्यावर आज जे संकट उभं आहे, त्याला उत्तर नवी युद्धं नाहीत, तर नवी मूल्यं आहेत. आपल्या ऋषीमुनींनी 'सर्वे भवन्तु सुखिनः...' अशी प्रार्थना केली. हेच ब्रीद घेऊन उभे राहिलेले सनातन राष्ट्र हे जगाला शांती, न्याय, संतुलन आणि सत्वगुण देऊ शकणारे उत्तर आहे. भारतच धर्मबळावर उभे राहून संकटग्रस्त जगाला दिशा देईल.



**चेतन राजहंस, राष्ट्रीय प्रवक्ता, सनातन संस्था**
**(संपर्क : ७७७५८५८३८७)**

## जालन्यात वंचित बहुजन आघाडीची तिरंगा रॅली

**जालना । प्रतिनिधी -** भारतावर दहशतवादी हल्ला झाल्यानंतर भारतीय जवानांनी त्यास प्रत्युत्तर दिल्याबद्दल तसेच पाकिस्तान सोबत लढताना भारतीय जवान शहीद झाले, त्यांच्या स्मरणार्थ वंचित बहुजन आघाडीच्या वतीने रविवारी ( दि. ११) जालना शहरातून तिरंगा रॅली काढण्यात आली. मस्तगड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून निघालेली ही तिरंगा रॅली मराठवाडा मुक्ती संग्राम हुतात्मा स्मारक येथे विसर्जित झाली. या रॅलीचे नेतृत्व वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डेव्हिड घुमारे, महासचिव प्रशांत कसबे, कार्याध्यक्ष परमेश्वर खरात, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष रमाबाई होर्शिल, युवा आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष हरीश रत्नपारखे आदींनी केले. या रॅली बाबत बोलतांना जिल्हाध्यक्ष डेव्हिड घुमारे म्हणाले की, पहेलगाम येथील पर्यटकावर २२ एप्रिल रोजी दहशतवादी हल्ला झाला, या हल्ल्याला भारतीय जवानांनी चोख प्रत्युत्तर दिले, पाकिस्तानमधील दहशतवाद्यांची केंद्रे भारतीय जवानांनी नेस्तनाबूत केली, या कारवाईत भारतीय जवान शहीद झाले, त्यांच्या स्मरणार्थ वंचित आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर व महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकूर यांच्या आदेशानुसार




आज जालना शहरात ही तिरंगा रॅली काढण्यात आली आहे. ड. प्रकाश आंबेडकर यांनी त्यांचा वाढदिवस साजरा न करता तो भारतीय जवानांना समर्पित केला आहे.

## विदेशी दारूसह महेंद्रा पिकअप ताब्यात; परतूर पोलिसांची कारवाई

**परतूर । प्रतिनिधी -** परतूरात दि.०९/०५/२०२५, रोजी सायंकाळी ५:३० वाजेच्या सुमारास पोलीस निरीक्षक सुरवसे यांना त्यांच्या गुप्त बातमी दारा मार्फत माहिती मिळाली की साईनगर परतुर येथे चार चाकी बोलेरो पिक अप गाडीमध्ये विदेशी दारूच्या मालाची चोरटी वाहतूक करीत आहेत अशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने पोनि सुरवसे यांनी तात्काळ स्टाफ ला माहिती देऊन रवाना केले. त्यावेळी साईनगर येथे स्टाफ गेला असता सदर पिकप हे सरकारी दवाखान्याच्या दिशेने जात असताना दिसले त्याचा पाठलाग करत त्याला थांबवून पिकप ची झडती घेतली असता पिकप मध्ये विदेशी दारूचे ११ बॉक्स मिळून आले.



बॉक्स व पिक अप.७,८८,८०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून पोलीस ठाणे परतुर येथे आरोपी नामे,

ओंकार उर्फ वंकर रामराव फटिंग वय २८ वर्ष रा साई नगर परतूर

सोन्या सिंग प्रेमसिंग टाक वय ४५ वर्ष रा साई नगर परतूर यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली एम.टी सुरवसे, पोलिस निरीक्षक, पो स्टे. परतूर, पोलीस उपनिरीक्षक केंद्रे साहेब,, पोहेका/ अशोक गाडवे, पोका/अच्युत चव्हाण , पोका/राम हाडे, पोका/ दीपक आडे, पोका/ सतीश जाधव,यांनी केली असून पुढील तपास पोहेका अशोक गाढवे करीत आहेत.



# गंमत-जंमत उन्हाळी शिबिरातून विद्यार्थ्यांत रुजविल्या पायाभूत शिक्षणाच्या संकल्पना

## चारशे विद्यार्थ्यांचा सहभाग; जेईएफ आणि जैन प्राथमिक विद्यालयाचा प्रेरणादायी उपक्रम

**जालना | प्रतिनिधी -** विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी सुट्टी म्हणजे विश्रांती, प्रवास आणि खेळांची मजा; पण जालना एज्युकेशन फाउंडेशन आणि जैन प्राथमिक विद्यालयाने सुट्टीचा उपयोग विद्यार्थ्यांमध्ये गणित आणि मराठी भाषेच्या पायाभूत संकल्पना विकसित करण्यासाठी पंधरा दिवशीय गंमत जंमत उन्हाळी शिबिर आयोजित करून गणित, मराठीचे ७५ विविध खेळ, उपक्रमाच्या माध्यमातून पायाभूत शिक्षणाचे बीज विद्यार्थ्यात रुजविले. त्यामुळे हे शिबिर एक प्रकारे पायाभूत शिक्षणाचा उत्सव ठरला.

दुसरी ते चौथीच्या तब्बल ४०० विद्यार्थ्यांनी दररोज चार तास हजेरी लावून या शिबिरात स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला. कडाक्याच्या उन्हातही पालक विद्यार्थ्यांना आणून सोडत होते. कारण येथे अभ्यास नव्हता, होता खेळातून शिकण्याचा उत्सव! या उन्हाळी शिबिराचा समारोप सोमवार दि. १२ मे रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहात झाला. अध्यक्षस्थानी जालना एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष सुनील रायठठ्ठा हे होते. व्यासपीठावर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी, सचिव सुरेश कुलकर्णी, विश्वस्त प्रा. ओमप्रकाश झांजरी, जैन श्रावक संघाचे अध्यक्ष सुदेश सकलेचा, सचिव डॉ. धरमचंद गादिया, उपाध्यक्ष भरतकुमार गादिया, सहसचिव कचरूलाल कुंकूलोळ, विश्वस्त संजयकुमार बंब, शालेय समितीचे अध्यक्ष विनोदकुमार मुथा, सदस्य प्रवीणकुमार बोरा, माजलगाव येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती राजश्री परदेशी, रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. दीपक बगडिया, शंभर रुपये सोशल क्लबचे उदय शिंदे, मुख्याध्यापिका श्रीमती गीता पोरवाल आदींची उपस्थिती होती.



शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे गणिताचे ४५ आणि मराठीचे २५ शैक्षणिक खेळ आणि कृती; ज्यांनी विद्यार्थ्यांत संकल्पनांची बीजे पेरली. चित्र बघून गोष्ट सांगणे, नाट्य-अभिनय, शब्दकोडी, संख्याज्ञान, बेरीज, वजाबाकी आणि संख्येची विस्तारित मांडणी, मोजणीचे व आकलन शक्ती वाढवणारे खेळ, कलाकृती निर्मिती यामुळे मुलांची भाषा समज, गणिती विचार, कल्पकता आणि अभिव्यक्ती यामध्ये लक्षणीय वाढ झाली.

शिबिराच्या समारोप समारंभात अध्यक्षीय भाषणात सुनील रायठठ्ठा म्हणाले की, खेळांमधून मूलभूत संकल्पना शिकवताना विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास उंचावतो. आत्मविश्वास असेल तर जीवनात काहीही अशक्य राहात नाही. प्रत्येक मुलामध्ये सुप्त शक्ती असते. गरज असते ती हनुमानासारखी त्यांना त्यांच्यातील सामर्थ्याची जाणीव करून देण्याची. डॉ. धरमचंद गादिया म्हणाले, सुट्टीतही दररोज ४०० विद्यार्थ्यांचा सहभाग म्हणजे त्यांच्या शिकण्यावरील प्रेमाचं आणि पालकांच्या विश्वासाचं जिवंत उदाहरण आहे. डॉ. धरमचंद गादिया म्हणाले की, जालना एज्युकेशन फाउंडेशन ने व्यापक प्रमाणात उन्हाळी शिबिर घेतले. सुट्ट्या असतानाही ४०० विद्यार्थ्यांनी हजेरी लावली. या शिबिरात पंधरा दिवसीय शिबिरात चित्र बघून गोष्टी बनविणे, नाट्य अभिनय याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये मराठी आणि गणिताच्या पायाभूत संकल्पना वृद्धिंगत झाल्याने त्यांची उन्हाळी सुट्टी निश्चितच सार्थकी लागली. प्रा. सुरेश लाहोटी म्हणाले, शाळा, शिक्षक आणि संस्थेने मनावर घेतले शिक्षणात क्रांती होऊ शकते. जैन प्राथमिक विद्यालयाने वर्षभरात साधलेली १०० पायाभूत साक्षरता याचेच उदाहरण आहे. हे शिबिर त्या वाटचालीचा एक महत्त्वाचा टप्पा ठरला. मुख्याध्यापिका श्रीमती गीता पोरवाल यांनी सांगितले की, या शिबिरात केवळ खेळ नव्हते, तर मुलांच्या आतला आत्मविश्वास जागवणारे अनुभव होते. मराठी आणि गणिताच्या पायाभूत संकल्पनांना स्पर्श करून, विद्यार्थ्यांनी शिकण्यात गोडी घेतली. फाउंडेशनच्या १५ जणांच्या टीमसह ३० स्वयंसेवकांनी शिबिराला योग्य दिशा दिली.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कलाकृती व खेळांचे प्रदर्शन भरवण्यात आले, ज्याला पालक आणि उपस्थित मान्यवरांनी मोठा प्रतिसाद दिला. प्रत्येक स्टॉलवर विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने सादरीकरण केले. भेट देणाऱ्यांनी केलेल्या कौतुकाने ते अक्षरशः भारावून गेले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या पर्यवेक्षिका मीरा मोहिते यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. राहुल लाहोटी यांनी मानले. याप्रसंगी शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जालन्यात वीज पडून एका तरुण शेतकऱ्याचा मृत्यू

**जालना | प्रतिनिधी -** तालुक्यातील भाटेपुरी येथे अंगावर वीज पडून एका २४ वर्षीय तरुण शेतकऱ्याचा मृत्यू झाला. विठ्ठल गंगाधर कावळे असं मयत शेतकर्याचं नाव आहे.



भाटेपुरी येथील शेतकरी विठ्ठल कावळे हा शेतात मान्सूपूर्व कामे करण्यासाठी गेला होता. मात्र अचानक दोन वाजेच्या सुमारास विजांच्या गडगडाटांसह वादळी वारा आणि पाऊस सुरु झाला. त्याचवेळी अंगावर वीज कोसळून विठ्ठल कावळे या शेतकर्याचा जागीच मृत्यू झालाय. गावकऱ्यांनी त्याला तात्काळ जालना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले असताना डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले याची माहिती कळताच मृतदेह प्रशासनाने शवविच्छेदनासाठी हलवण्यात आलाय. शवविच्छेदना नः तर मृतदेहनातेवाईकांच्या स्वाधिन करण्यात आला असून भाटेपुरी येथे अंत्यसंस्कार करण्यात येत आहे. या घटनेने पंचक्रोशीत शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.